www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

दैं.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड ,आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

सोमवार दि. 09 जून २०२५ RNI MAHMAR/2023/89514

## दृष्य सत्य

### जनतेच्या नजरेतून शासनाच्या दरबारात

### गिरगावात आठवड्यांपासून साचलेला कचरा — BMC चं दुर्लक्ष नागरिकांच्या सहनशक्तीला आव्हान!




प्रतिनिधी
योगिता सावंत, मुंबई

गिरगावातील चर्नीरोड समोरील रस्त्यावर आठवडाभर साचलेला कचरा नागरिकांना आणि दुकानदारांना त्रस्त करतोय. दुर्गंधी आणि अस्वच्छतेमुळे परिसरातील जीवनावस्था बिकट झाली आहे. 'TOP-10 MOBILE SHOP'सह अनेक व्यावसायिकांनी तक्रार केली, तरीही मुंबई महानगरपालिकेने अद्याप कोणतीही कारवाई नाही

**आता वेळ आली आहे की BMC त्वरित या समस्येकडे लक्ष देऊन परिसर स्वच्छ करावे आणि नागरिकांचे आरोग्य व सुरक्षितता सुनिश्चित करावी.**

# दैनिक युवक आधारच्या मराठवाडा विभागीय पत्रकारांची मार्गदर्शन, परिषद उत्सहात पार पडली...






**दैनिक युवक आधार**
**आसाराम वीरकर**
**मराठवाडा उपसंपादक**

छत्रपती संभाजीनगर येथील सुभेदारी शासकीय विश्रामगृहात दैनिक युवक आधारच्या मराठवाडा विभागीय बैठकीत पत्रकारांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मुख्य संपादक संतोष जी आमले,सहसंपादक मुकुंद कांबळे, मराठवाडा विभागीय संपादक प्राचार्य जगन्नाथ रासवे, मराठवाडा विभाग प्रमुख राजू शिंदे ,आणि मराठवाडा आवृत्तीचे उपसंपादक आसाराम विरकर यांनी पत्रकारांची प्रेरणा वाढविण्यासाठी आपले विचार मांडले.

प्राचार्य जगन्नाथ रासवे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पत्रकारांचे विस्तृत नेटवर्क निर्माण करणे आणि युवकांच्या, शेतकऱ्यांच्या समस्या मांडणे हे पत्रकाराचे परम कर्तव्य आहे. तसेच, दैनिक युवक आधार रुपी रोपट्याचे वटवृक्ष करण्यासाठी सर्व पत्रकारांनी पालकत्व स्वीकारून तन-मन-धनाने काम करावे, असे त्यांनी आवाहन केले.

यावेळी उपस्थित पत्रकारांनी एकमताने दैनिक युवक आधारच्या विस्तारासाठी दृढ निश्चय व्यक्त केला.




# १९९७ दहावी बॅच मधील 28 विद्यार्थी विद्यार्थिनीनी दिला जून्या आठवणींना उजाळा

### गुरूवर्य शिक्षकांना सन्मानपत्र देऊन केला गौरव.

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :-**
**मारुती सत्रे**

तब्लल २८ वर्षांपूर्वी एकत्र शिकत असलेल्या माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी यांची पुन्हा एकदा आष्टीत शाळा भरली. बेचाळीशी ओलांडलेल्या विद्यार्थ्यांनी त्याकाळी शाळेतील बाकांवरच्या मित्र-मैत्रिणी सोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. निमित्त होते आष्टी शहरातील जिल्हा परिषद मुलांची शाळा आष्टी,श्री गणेश विद्यालय आष्टी,पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय आष्टी, जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी या चार शाळेतील इयत्ता दहावीच्या १९९७ वर्षातील शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे गेट-टुगेदर स्नेहसंमेलन शनिवार दि.७ जून रोजी आष्टी येथील मोरेश्वर लॉन्स येथे पार पडले.यावेळी तब्बल चार शाळेतील २० गुरूवर्य शिक्षकांना साल,सन्मानपत्र,गुच्छ देऊन गौरव करण्यात आला. या गेट-टुगेदर स्नेहसंमेलनात तब्बल १२० विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.तर २० शिक्षक व शिक्षीका यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाच्या अगोदर काही शिक्षकांचे निधन झाले अशांना व बॅचमधील ज्या मित्रांचे दुर्दैवाने निधन झालेली आहेत अशा सर्व मित्र-मैत्रिणींना व युद्धातील शहीद झालेल्या जवानांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात केली.

तब्बल २८ वर्षानंतर सर्व विद्यार्थ्यांना एकमेकांना पाहून खुप आनंद वाटला. सर्व विद्यार्थी

**२० शिक्षकांना सन्मानपत्र देऊन केला गौरव**
शिक्षक संपत गायकवाड, पोपटराव भोसले,अशोक काकडे, रामराव चव्हाण, प्रल्हाद काळे, महादू शिंदे, चांगदेव सातव, लहु करपे,वामन निकाळजे, रमेशसिंह देसुरकर, जी.एम भागवत, भाऊसाहेब जगताप, सुनील काकडे, दादासाहेब खाडे, मधुकर सोळसे,संभाजी नवसुपे, शिक्षिका विजया संत्रे, मंगलप्रभा गर्जे,निर्मला सोले, मुक्ता बनसोडे या २० शिक्षक गुरूवर्य यांना साल, गुच्छ, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

आपापल्या विविध क्षेत्रात काम करत असून आजच्या कार्यक्रमासाठी वेळ काढून हे सगळे विसरून फक्त सर्व विद्यार्थी म्हणूनच एकत्र आले होते. या गेट-टुगेदर साठी जवळजवळ पंधरा ते वीस दिवसांपासून सर्व स्थानिक विद्यार्थी यांचे नियोजन चालू होते. आज त्या नियोजनाला मूर्तीमंत रूप आले. तब्बल एक वर्षांपूर्वी सर्व दहावीच्या १९९७ च्या बॅचने एकत्र येण्याची संकल्पना आष्टी येथील चार हि शाळेतील मित्रांनी बोलून दाखवली होती. व त्यासाठी सर्वच जण सतत कार्यरत असलेले स्थानिक मित्र-मैत्रिणी यांना कार्यक्रमाची रूपरेषा ठरवून कार्यक्रमाचे आयोजन कसे चांगले करता येईल यासाठी सर्वांनी प्रयत्न केले. जवळजवळ महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात विद्यार्थी राहत असल्यामुळे सर्वांचे नंबर कलेक्ट करणे त्यांना वेळोवेळी कॉन्टॅक्ट करून कार्यक्रमाविषयी आस्था निर्माण व्हावी यासाठी वेळोवेळी संपर्क साधून "१९९७ बॅच" हा व्हाट्सअप ग्रुप तयार करण्यात आला व त्या ग्रुपवर नंतर सगळ्या मित्रांना ॲड करून ग्रुप चालू झाला व त्यावर गेट-टुगेदर च्या कार्यक्रमाची सूचना व फायनल तारीख सर्वांच्या मते ठरवण्यात आली. तो आनंदाचा दिवस उजाडला कार्यक्रमाचे ठिकाणी विद्यार्थी पोहोचल्यावर प्रथम त्यांच्याकडून स्वतः सध्या कार्यरत असलेल्या ठिकाणची माहिती रजिस्टरमध्ये नोंद करण्यात आली.त्यानंतर सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना फेटा बांधून वाजत गाजत शाळेसारख्या लाईनीमध्ये लॉन्समध्ये प्रवेश करून कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यात सर्वांचा परिचय करून घेण्यात आला.त्यानंतर काही शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. सकाळी नाश्त्याचा कार्यक्रम झाल्यानंतर व दुपारी भोजनाचा कार्यक्रम पार पडल्यानंतर दुपारच्या सत्रातही. या सगळ्या गोष्टींमध्ये सर्व विद्यार्थी आपलेआजचे वय सध्या जगण्याची सगळे टेन्शन विसरून खरंच परत एकदा त्या काळातील विद्यार्थीच झाले होते.त्यांच्या चेहऱ्यावरच्या आनंद दिसत होता. सगळे एकमेकांना जुन्या गोष्टीची आठवण करून देऊन जुने किस्से सांगत होते.यानंतर सर्वच विद्यार्थ्यांनी डिजेच्या विविध गाण्यांवर मनसोक्त नाचण्याचा आनंद लुटला. आणि सर्व विसरूनच गेले होते जणू २८ वर्षात राहिलेल्या सर्व गोष्टी जणू सर्व विद्यार्थी आजच्या कार्यक्रमात भरूनच काढत होते. **पान २ वर**

# श्री शनैश्वर देवस्थानात मुस्लिम कर्मचाऱ्यांची नियुक्ती, श्रद्धाळू भक्तांचा आक्षेप



**दैनिक युवक आधार**
**आसाराम वीरकर**
**शनी शिंगणापूर (अहमदनगर)**

येथील श्री शनैश्वर देवस्थानात तब्बल ११८ मुस्लिम कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचा आरोप, श्रद्धाळू भक्तांमध्ये संतापाचा सूर उमटवणारा ठरला आहे. या संदर्भात श्रद्धाळू भक्त जयेश नागोन्द्रनाथ शहा यांनी शनैश्वर देवस्थान ट्रस्टला पत्र पाठवून आपल्या नाराजीची भूमिका मांडली आहे. जयेश शहा यांनी आपल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे की, श्री शनैश्वर देवस्थान हे हिंदू धर्मस्थळ असल्याने त्याच्या व्यवस्थापनात इतर धर्मीयांची नियुक्ती करणे धार्मिक आस्थेला बाधा आणणारे आहे. हिंदू परंपरेनुसार, मंदिर प्रशासन आणि पूजाअर्चा कार्यात केवळ हिंदू धर्मीय व्यक्तींचीच नेमणूक व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. जर याप्रकरणी त्वरीत कार्यवाही केली गेली नाही, तर श्रद्धाळू भक्त मंदिर भेट देणे थांबवतील, असेही त्यांनी इशारा दिला आहे.

या पार्श्वभूमीवर शनैश्वर देवस्थान ट्रस्टने याबाबत आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी जयेश शहा यांची मागणी आहे.

# *शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून हिंदी मराठी पत्रकार संघातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

दैनिक युवक आधार
संपादक संतोष आमले

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा 351 वा शिवराज्याभिषेक दिन संपूर्ण देशभर साजरा केला जात आहे. याच पावन दिनाचे औचित्य साधून हिंदी मराठी पत्रकार संघातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिनव पद्धतीने अभिवादन करण्याच्या उद्देशाने नुकत्याच झालेल्या शालांत परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र प्रदेश कार्यालय मलकापूर येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्याअर्पण करून करण्यात आली कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून धनश्रीताई काटेकर पाटील महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ, अजय टप विदर्भ अध्यक्ष, श्रीकृष्ण तायडे जिल्हा अध्यक्ष, रवींद्र गणगे सर जिल्हा सचिव, हे होते सदर कार्यक्रमात शालांत परीक्षेमध्ये यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सुवर्णपदक देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमांमध्ये नेहा विजय मेहसरे ,आनंदी विजय जावरे, भारती अनिल वानखेडे ,प्रीती अनिल वानखेडे ,गायत्री धर्मसिंह राजपूत, शबाना निसार शेख ,श्रेया विजय मेहसरे ,आधिराज श्रीकृष्ण तायडे ,रणवीर प्रदीप इंगळे,वेदांत भगवान चोपडे ,तुषार प्रदीप इंगळे ,जय विकास गाढे ,मोहम्मद जीशान मोहम्मद शकील ,मोहम्मद जियान मोहम्मद शकील ,मोहम्मद अर्शद मोहम्मद सलीम ,मोहम्मद फैयाज मोहम्मद इसाक,मोहम्मद उमरे मोहम्मद जुबेर



,मोहम्मद शहीद मोहम्मद साबीद इत्यादी विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा प्रकाश थाटे , रवी गव्हाळे ,शेख निसार, प्रदीप इंगळे, धर्मेश राजपूत, सुधाकर तायडे, मयूर लड्डा, सय्यद ताहेर, शकील कुरेशी शिक्षक उर्दू गर्ल हायस्कूल यांनी परिश्रम घेतले



# 'सायकल चालवा, पर्यावरण वाचवा – डबेवाले संघटनेचे अध्यक्ष"सुभाष तळेकर यांचे आवाहन"

**दैनिक युवक आधार**
**-किशोर रमाकांत गुडेकर**
**,मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

सायकल चालविणे आरोग्यासमवेतच पर्यावरणीयदृष्ट्याही हितकारक असून शहरात सायकल संस्कृती रुजविण्यासाठी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक संघटना आणि वैयक्तिकरित्याही सगळ्यांनी पुढाकार घेतला पाहिजे, असे वक्तव्य मुंबई डबेवाला असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी सायकल दिवसाच्या पुर्व संध्येला केले आहे.

तरूण मुलांमध्ये सायकलिंगबद्दल प्रेम वाढत आहे ही चांगली बाब आहे. परंतु सायकलसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यासाठी लागणारी राजकीय इच्छाशक्ती आपणाकडे निर्माण झाली पाहिजे, असेही ते पुढे म्हणाले.

सुभाष तळेकर यांनी नमूद केले की, जवळपास दोन शतकांपासून आपण सायकलीचा वाहतुकीसाठी वापर करत आहोत. सायकलीच्या वापराबाबत जनजागृती निर्माण होण्यासाठी सायकल दिन साजरा केला जातो. हल्ली कमी अंतराच्या प्रवासासाठीही दुचाकी आणि चारचाकींचा सर्रास वापर केला जातो. त्यामुळे प्रदूषण, तापमानात प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे. हे सर्व थांबविण्यासाठी शक्य तेवढ्या जास्त प्रमाणात प्रवासासाठी सायकलचा वापर करणे, हाच एकमेव पर्याय असू शकतो.

आंतराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळवलेले मुंबईचे डबेवाले गेली कित्येक वर्ष मुंबईत डबे पोहचवण्याची सेवा सायकलच्या माध्यमातून देत आहेत. खिशाला परवडेल अशा किमतीत उपलब्ध असलेली सायकल त्यांच्यासाठी अत्यंत उपयुक्त असे वाहन आहे. इंधनाचे दर गगनाला भिडले आहेत परंतु सायकलला इंधन लागत नसल्यामुळे इंधन वाढीची चिंता येथे नाही. सायकल पर्यावरणपूरक असल्यामुळे तिच्यामुळे प्रदूषणालाही आळा बसतो, असेही ते पुढे म्हणाले.

व्यवसायनिमित्त डबेवाल्यांना दररोज अनेक किलोमिटरचे अंतर सायकलनेच गाठावे लागते. सायकल चालवण्याच्या या रोजच्या सवयीमुळे डबेवाले अत्यंत तंदुरुस्त असून रक्तदाब, मधुमेह, हदयविकारासारखे आजारही त्यांच्यापासून दूर आहेत. त्यामुळे साठी,सत्तरी पार केलेले डबेवाले देखील सायकलच्या माध्यमातन डबे पोहचवण्याचे काम अद्यापही करत आहेत. दररोज सायकल चालवून सर्व आजारांना दूर ठेवा आणि तंदुरुस्त राहा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## रिसोड शहर व तालुक्यात ईद उल अजहा मोठा उत्साहात साजरी करण्यात आली

**दैनिक युवक आधार**
**रणजीतसिंग ठाकूर**
**रिसोड प्रतिनिधी**

रिसोड नंतर तो टॉवेल स्पेशल व्हाट्सअप द्यावा लागतो रिसोड शहर व तालुक्यात ईद उल अज़हा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील सर्व मुस्लिम बांधव सकाळी 8:30 वाजता चांदणी चौकात एकत्रित झाले. तिथून सर्व लोणी मार्गावरील ईदगाह मैदानावर पोहोचले. तेथे नऊ वाजता शाही इमाम मो. दयार यांच्या मागे सर्व मुस्लिम बांधवांनी नमाज अदा (पठन) केली. यावेळी देशात शांती सदभावना नांदावि व तसेच देशात सुखरूपते करिता प्रार्थना करण्यात आली. नमाज अदा केल्यानंतर सर्व मुस्लिम बांधवांनी एकमेकांना गळाभेट करत शुभेच्छा दिल्या. यावेळी ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वात ईदगाह मैदानावर पोलिसाचा तगडा बंदोबस्त होता.



## गुरूवर्य शिक्षकांना सन्मानपत्र देऊन केला गौरव.

**पान १ वरून** हा गेट-टुगेदरचा कार्यक्रम सुरळीत व्हावा यासाठी स्थानिक विद्यार्थी राजीव नरवडे,अविनाश कदम,शरद रेडेकर,राजु गोल्हार, राहुल भोसले, प्रितम कासवा, संतोष कदम,शरद गायकवाड,डॉ रामदास सानप,राजु कारंडे,राहुल निकाळजे,शहादेव धनवडे,महेश टेकाडे,रोहिदास पवार,अमृत वाढरे, नितिन सायकर, डॉ प्रियंका हंबर्डे,अश्विनी निबोरे,मनिषा शिंदे,अनुप्रिता मेहेर,अर्चना पांडव,अंबिका जगताप,रूपाली मेहेर, प्रियंका मेहेर,चंदा धनवडे,हारूबाई सुळे यासह सर्व विद्यार्थी मित्रांनी मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिक्षक संपत गायकवाड हे होते.यावेळी शिक्षक प्रल्हाद काळे,महादू शिंदे, लहु करपे,वामण निकाळजे, शिक्षिका विजया संत्रे, मुक्ता बनसोडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले शेवटी अध्यक्ष भाषण संपत गायकवाड यांचे झाले. तर विद्यार्थी मधून डॉ मुकुंद विधाते, प्रकाश हंबर्डे, डॉ फेरोज तांबोळी,प्रितम कासवा,शरद रेडेकर,अतुल मुळे व विद्यार्थीनींनी मधून डॉ प्रियंका हंबर्डे, मनिषा शिंदे,अनुप्रिता मेहेर यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल निकाळजे यांनी केले तर बहारदार सूत्रसंचालन शिवानी शिंगवी यांनी तर आभार अविनाश कदम यांनी मानले.व या धावपळीच्या जगात वर्षातून एकदा तरी सर्व मित्रांनी एकत्र येण्याचे ठरवून कार्यक्रम घेण्याचे ठरवले आहे. हा कार्यक्रम अतिशय खेळीमेळीच्या व आनंदात यशस्वीरित्या पार पडला.व शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पत्रकार दत्तात्रय फाळके यांचा महाराष्ट्र आयकॉनिक अवार्ड पुरस्काराने सन्मान

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून स्काय इंटरनॅशनल टूरिझम व राजधानी नाविन्यपूर्ण सहकारी संस्था , पाटण सातारा यांनी महाराष्ट्र कर्मयोगी सन्मान कौतुक परिषद कराड येथे आयोजित केली होती. या कौतुक सन्मान परिषदेमध्ये संपूर्ण महाराष्ट्रभर कौतुकास्पद कार्य करणाऱ्या कार्यवीरांचा राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात तडवळे तालुका खटाव गावचे सुपुत्र तसेच डीएसपी न्यूज लाइव चॅनेलचे संपादक , डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघ खटाव तालुका सहखजिनदार पत्रकार श्री.




दत्तात्रय फाळके डीएसपी यांचा महाराष्ट्र आयकॉनिक अवार्ड पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. त्यांनी केलेल्या सामाजिक , शैक्षणिक तसेच पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांना हा पुरस्कार लक्ष्मीची पाऊले मालिकेतील राहुल , सातारा जिल्हा पालकमंत्री शंभूराजे देसाई यांचे निकटवर्तीय देशमुख साहेब , जागतिक विश्वविक्रमवीर योगा ब्रॅण्ड अँबिसिडर डॉक्टर जान्हवी इंगळे , माजी आमदार आनंदराव पाटील नाना , प्राध्यापक बी.एन खरात यांच्याहस्ते पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. त्यांचा महाराष्ट्र आयकॉनिक अवार्ड पुरस्काराने सन्मान करण्यात आल्याने त्यांना विविध स्तरातून शुभेच्छा देऊन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. हा पुरस्कार वितरण सोहळा सौ.वेणूताई चव्हाण स्मारक सभागृह कराड याठिकाणी पार पाडला. या कार्यक्रमासाठी सुप्रसिद्ध अभिनेता लक्ष्मीची पाऊले मालिकेतील राहुलची भूमिका साकारणारे धुव्र दातार , मा.श्री. शंभूराजे देसाई ( पर्यटन , खाणकाम , माजी सैनिक कल्याण विभाग मंत्री ) सातारा जिल्हा पालकमंत्री यांचे निकटवर्तीय विजय देशमुख साहेब , माजी आमदार आनंदराव पाटील नाना , जागतिक विश्वविक्रमवीर योगा राष्ट्रीय ब्रॅण्ड अँबिसिडर डॉक्टर जान्हवी इंगळे मॅडम , मा.श्री.सतीश भोसले ग्रामविकास अधिकारी माण , प्रा.डॉ.बी.एन.खरात ( संचालक स्काय इंटरनॅशनल टूरिझम महाराष्ट्र ) , श्री.दिलीप नाना कदम ( संचालक , राजधानी नाविन्यपूर्ण सहकारी संस्था पाटण ) , श्री. शरद यादव ( सामाजिक कार्यकर्ते सातारा ) इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा ब्रह्माकुमारी विद्यालयात सत्कार; पर्यावरणाबाबतही दिला संदेश .

**कारंजा लाड:** प्रजापिता ब्रह्माकुमारी प्रजापिता विद्यालय हिरपूर शाखेत जिल्हा संचालिका राजयोगीनी सीता दिदी यांच्या मार्गदर्शनाखाली दि.७ जून रोजी दहावी व बारावी परीक्षेत प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला. या विशेष प्रसंगी अँड. रमेश फडनाईक यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह तसेच प्रत्येकी ₹५०० रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. सत्कारमाध्ये श्रुतिका वैराळे, जानवी सावरकर, रेणुका सपकाळ, रुद्र हेमणे, ओजस्विनी पाटील, उन्नती गणोरकर, गायत्री यादव, संजीवनी इंगळे, सारा घोडेस्वार, प्रतीक चौधरी या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. पर्यावरण संरक्षणाचा संदेश म्हणून प्रत्येक गुणवंत विद्यार्थ्याला बेलवृक्षाचे रोप भेट देण्यात आले. पर्यावरण रक्षणाबद्दल जागरूकता निर्माण करणे हा उद्देश विद्यार्थ्यांना मोठा संदेश देणारा ठरला.



या प्रसंगी प्रा. सुधाकर गौरखेडे, अँड. शिवानी गुप्ता, क्रीडा अधिकारी ऋषिकेश गावंडे व पत्रकार विलास नसले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. “५०% पेक्षा कमी गुण मिळाले तरी हार न मानता, कठोर परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन व चिकाटी यांच्या जोरावर यश संपादन करता येते,” असे ते म्हणाले. त्यांनी विद्यार्थ्यांना अपयशावर मात करत नव्या उमेदीनं पुढे जाण्याचे आवाहन केले. रोहित सोळंके पत्रकार, दिलीप तिहीले पत्रकार, विलास वानखडे समाजसेवक, संजय फडणाईक, विनोद राजगुरे, आशिष गावंडे यांची सुद्धा विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमात ८५ वर्षीय अँड. रमेश फडनाईक यांचा वाढदिवसही साजरा करण्यात आला. वयाच्या साठीनंतर एलएलबी पूर्ण करून आजही सामाजिक व कायदेशीर सेवेत सक्रिय असलेल्या फडनाईक यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले. सुधीर हेमणे व ब्रह्माकुमार अमोल ढोले यांनी सादर केलेल्या भक्तिगीतांनी संपूर्ण वातावरण भक्तिमय केले.कार्यक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी सोपानभाई, गजाननभाई, देवानंदभाई, सुयोग वह्रेकर ,संदीप मेहरे, शुभदाताई, स्वातीताई, छायाताई, लक्ष्मीमाता, सीतामाता, कमलामाता, डॉ. ढाकरे यांचे मोलाचे योगदान लाभले. संचालन मुक्तादिदी यांनी तर आभार प्रदर्शन प्रवीणभाई यांनी केले.

## रिपाइंच्या जिल्हा उपाध्यक्षपदी प्रमोद खंडाळे तर सचिवपदी सोमनाथ सोंमाडे यांची नियुक्ती,



**प्रतिनिधी**

बारामती : रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार, रिपब्लिकन पक्षाचे तालुका निहाय बैठका सुरु आहेत, त्या अनुषंगाने पुणे जिल्हा रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा अध्यक्ष श्रीकांत कदम यांच्या अध्यक्षतेखाली बारामती येथे बैठक घेण्यात आली .

यावेळी म्हसोबाची वाडी इंदापूर येथील रहिवासी प्रमोद खंडाळे यांची रिपब्लिकन पक्षाच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी तर बारामती येथील रहिवासी सोमनाथ सोंमाडे यांची जिल्हा सचिवपदी नियुक्ती करण्यात आली, जिल्हाध्यक्ष श्रीकांत कदम यांनी त्यांना नियुक्ती पत्र दिले, यावेळी रिपब्लिकन पक्षाचे वरिष्ठ उपाध्यक्ष नरेश डाळींबे बारामती तालुक्याचे तालुका अध्यक्ष संजय वाघमारे, भोर तालुका रिपब्लिकन पक्षाचे तालुका अध्यक्ष राहुल कांबळे, दौंड शहर रिपब्लिकन पक्षाचे शहर अध्यक्ष नागेश साळवे, मुळशी तालुका सरचिटणीस मनिष गायकवाड, भोर तालुका रिपब्लिकन पक्षाचे सरचिटणीस दिपक गायकवाड, सिमा घोरपडे, अध्यक्ष पुणे जिल्हा महिला आघाडी, विजय ओव्हाळ, मयुर मोरे, अनिल लांडगे, भोर तालुका युवक आघाडीचे अध्यक्ष सुमित वर्वेकर वैभव जगताप, बारामती तालुक्याचे माजी अध्यक्ष मधुकर मोरे, आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्या आदेशानुसार आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा आढावा भारत जिंदाबाद यात्रा, तालुका कार्यकारिणी व जिल्हा कार्यकारिणी विस्तार करणे, या साठी जिल्हाध्यक्ष श्रीकांत कदम यांच्या अध्यक्षतेखाली बारामती येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, यामध्ये वरील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात बारामती तालुका रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष संजय वाघमारे यांनी बैठकीचे आयोजन केले होते,

# अँटी करप्शन मानवाधिकार सर्वशक्ती सेनेतर्फे शिवराज्याभिषेक दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

जळगाव : अँटी करप्शन मानव अधिकार सर्व शक्ती सेना महाराष्ट्र राज्याच्या वतीने हिंदवी स्वराज्य स्थापनेचे जनक छत्रपती शिवाजी महाराजाचा 351 वा दिव्यभव्य राज्याभिषेक हिंदू साम्राज्य दिन साजरा झाला. अध्यक्षस्थानी अँटी करप्शन मानव अधिकार सर्व शक्ती सेना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष तथा भाजप राज्य सचिव प्रा. संजय मोरे होते. विशेष प्रमुख अतिथी संभाजी नगरचे विवेक विचार मंच प्रांत संयोजक अरुण कराड अँटी करप्शन फाउंडेशन ऑफ इंडिया युवक राज्य उपाध्यक्ष प्रशांत जाधव होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्याला प्रा. संजय मोरे, अरुण कराड, डॉ. संदीप गाढे, प्रशांत जाधव यांनी पुष्पहार अर्पण केले. त्या प्रसंगी प्रा. संजय मोरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, भारताला आपली मातृभूमी मानणारा प्रत्येक नागरिक छत्रपती शिवाजी महाराज्याचा हिंदवी स्वराज्याचा मावळा आहे. देशाला वैभवशाली समृद्ध करण्यासाठी शिवरायाचा प्रत्येक मावळा देशविघातक शक्तीविरुद्ध लढण्यास तयार झाला. भारत देशाला अखंड करण्याची प्रेरणा केवळ छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेक सोहळ्यातूनच मिळते. म्हणूनच नित्य राष्ट्र आराधना करताना हिंदू साम्राज्य दिनाचे भारताच्या प्रत्येक युवकाने व नागरिकांनी केले पाहिजे. आजच्या युवा पिढीने छत्रपती शिवाजी महाराज यांचे आचार, विचार, राष्ट्रप्रेम, आत्मसात करावे. यातच देशाचे राज्याचे व स्व:ताहाचे कल्याण आहे, असे प्रा. संजय मोरे यांनी सांगितले. या कार्यक्रमास सर्व शक्ती सेना राज्य उपाध्यक्षा माया मोरे, अँटी करप्शन राज्य उपाध्यक्ष विवेक बोडे, विवेक विचार मंच प्रांत संयोजक अरुण कराड, अँटी करप्शन राज्य उपाध्यक्ष प्रशांत जाधव, डॉ. महेंद्र सुरवाडे, डॉ. संदीप गाढे, डॉ. धनराज बावस्कर प्रा. सुनील तायडे, प्रा. योगिता सपकाळे, प्रा. अनिल सपकाळे, मानव अधिकार जिल्हाध्यक्ष बाळा शिरतुरे, मानव अधिकार युवक जिल्हाध्यक्ष सचिन सुरवाडे, सर्व शक्ती सेना युवक जिल्हाध्यक्ष मयूर कोळी, प्रा. स्नेहा सोनवणे, विकास सावळे, रंजना सावळे, उमेश सावळे, शोभा कोळी, रामभाऊ पाटील आदी उपस्थित होते. डॉ. संदीप गाढे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. धनराज बावस्कर यांनी आभार मानले.

## मामाच्या गावाला आलेल्या मुलाचा शेततळ्यात पडून मृत्यू*

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**



**विंचूर** :- खडकमाळेगाव ता. निफाड येथे सुट्टीनिमित्त मामाच्या गावाला आलेल्या १० वर्षीय बालकाचा मृतदेह शेततळ्यात आढळल्याने परीसरात एकच खळबळ उडाली आहे. कु.युवराज मंगेश कोकाटे वय १० वर्ष रा.एम.आय.डी.सी.सातपुर, नाशिक हा सुट्टीनिमित्त खडकमाळेगांव येथे मामाच्या गावाला आला होता. मात्र तो दि.५ जून सायं ६ वाजेपासून गायब होता. याबाबत पो.पा.वैशाली बाजारे यांनी लासलगाव पोलीस स्टेशनला कळवले असता स.पो.नि.भास्करराव शिंदे यांनी फौजफाट्यासह खडकमाळेगाव येथे दाखल होऊन परिसरात शोध घेत घेतला. शोधमोहीम सुरु असतांना दि.६ जून रोजी दुपारी २ वाजता दिंगबर गायकवाड यांना संजय वामन गवळी याचे मालकिची शेत गट नंबर १६ मधील पाण्याचे शेततळ्यात त्याचा मृतदेह पालथ्या स्थितीत तरंगतांना मिळुन आला. याबाबत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून स.पो.नि.भास्करराव शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पो.ऊ.नि.किसन पवार अधिक तपास करीत आहेत.

# भाजप नेते बाळासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम...

### भाजप पक्ष निष्ठावंत लोकसेवक ते लोक नेतृत्व संघर्ष योद्धा.. आमदार विक्रांत पाटील

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

म्हाडा कोकण विभागाचे मा. सभापती बाळासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त “एक थेंब रक्त कुणासाठी तरी संजीवनी ठरू शकतो” या भावनेतून
रक्तदान , एन एम टी बस उद्घाटन सोहळा, क्रीडाप्रेमींसाठी खास पर्वणी,भव्य बास्केटबॉल स्पर्धा, भव्य उद्योजक संवाद मेळावा, छत्री वाटप ,अन्नधान्य वाटप, रिक्षा चालकांना कुपन, गौमाता चारा वाटप कार्यक्रम उपक्रम आयोजन राहुल भाऊ बोर्डे-विक्रांत दादा पाटील प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले .१० वी व




१२ वी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व प्रेरणादायी व्याख्यान कार्यक्रम नियोजन बद्ध पद्धतीने संपन्न झाला. या उपक्रमाचे प्रमुख पाहुणे ,आयोजन व सहकार्य उपस्थिती म्हणून विधानपरिषद आमदार विक्रांत पाटील ,सी.सी. भगत, सिद्धार्थ बांठिया, विवेक गोरे, तानाजी खंडागळे, निलेश चौंदकर, प्रदीप देशमुख आणि संदीप मोहिते , देविदास खेडकर, प्रभूदास अण्णा भोईर, महादेव पाटील (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस)मा.नगरसेवक राजू शर्मा, मा.नगरसेवक रवी भगत, बबन मुकादम, समीर कदम,बबन बारगजे, कातारा ताई, राजेंद्र बागल आणि कल्पना मोटे आदी शुभचिंतक कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक आणि युवकवर्ग उपस्थित होते. तसेच दि. ०८ जून २०२५ दुपारी ४:०० वाजता केन्द्रीय विहार मेट्रो स्टेशन खालील पार्किंग, सेक्टर १२, खारघर येथे सुप्रसिद्ध सिने-अभिनेत्री शिवानी सुर्वे (‘देवयानी’, ‘फुलवा’ मालिका आणि ‘ट्रिपल सीट’ चित्रपट फेम)या सर्व उपक्रमांमध्ये सहभागी राहणार आहे . न्यू होम मिनिस्टर” खेळ – रंगला पैठणीचा या कार्यक्रमाच्या माध्यमातून गृहिणींना त्यांची नेतृत्वक्षमता, संवादकौशल्य आणि विनोदबुद्धी दाखवण्याची संधी मिळणार आहे. या सर्व सामाजिक उपक्रमासाठी युवा महाराष्ट्र प्रतिष्ठान व आमदार विक्रांत बाळासाहेब पाटील जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने सुंदर नियोजन करण्यात आले होते.

## कळंबोलीत जनतेच्या सेवेसाठी आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्या हस्ते दैवत टॅक्सी स्टँडचे उद्घाटन.

**दैनिक युवक आधार**
**कळंबोली वार्ताहर**

लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त सेक्टर 17 येथे दैवत टॅक्सी स्टॅन्ड या नावाने जनतेला टॅक्सी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी टॅक्सी स्टॅन्ड चे उद्घाटन आमदार प्रशांत यांच्या हस्ते रविवार दिनांक ८ जून रोजी संपन्न झाले सदर उद्घाटन प्रसंगी भाजपाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील कळंबोली शहराध्यक्ष अमर पाटील माजी शहराध्यक्ष रवीनाथ पाटील भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबनराव बारगजे माजी नगरसेवक बबन मुकादम,राजू शर्मा,रविंद्र भगत,प्रमिलाताई पाटील तसेच प्रिया मुकादम प्रभुआण्णा भोईर,अमर ठाकूर विजय भोईर व




टॅक्सी स्टँडचे संस्थापक महेश बारगजे व त्यांचे सर्व सहकारी उपस्थित होते. कळंबोली मधील नागरिकांना मुंबई नवी मुंबई रायगड आणि इतर जिल्ह्यात कोठे ही जाण्यासाठी टॅक्सी सुविधा चालू करण्यात आलेली आहे याचा लाभ सर्व नागरिकांनी घ्यावा असे आवाहन बबन बारगजे यांनी केले आहे

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

## पनवेल बाजारपेठेत वटपौर्णिमा निमित्ताने 'फणस विक्रीला

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

वटपौर्णिमा सण येत्या 10 जून रोजी येत असल्याने घाऊक बाजारात कच्च्या फणसासोबत पिकलेल्या फणसाची चांगली आवक सुरु झाली आहे. त्यामुळे बाजारात फणसाचा गोड सुगंध सर्वांचे लक्ष वेधून घेत असून, फणसाच्या मागणीत वाढ होत असल्याचे चित्र पनवेल बाजारात दिसत आहे. आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी सुवासिनी दरवर्षी वटपौर्णिमा दिनी उपवास करतात. यानिमित्त महिला एकमेकींना फळाचे वाण देत असतात. या वाणात आंब्यासह फणसाच्या गरांना मोठे महत्त्व आहे. घरात गोडधोड पदार्थ म्हणून स्त्रिया बरका फणसाच्या पोळ्या बनवतात. तर कापा फणस वाण भरण्यासाठी वापरतात. याच पार्श्वभूमीवर वटपौर्णिमा दिवसाच्या तीन-चार दिवस आधीच कोकणातून मोठ्या प्रमाणात पनवेल परिसरातील विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत.

## एनएमएमटीच्या खारघर ते तळोजा फेज-2चा विस्तार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

एनएमएमटी परिवहन उपक्रमाची बस मार्ग क्र-45 खारघर रेल्वे स्थानक ते तळोजा फेज-2 शिवसेना कार्यालय अशाप्रकारे आसुडगांव आगारातून कार्यान्वित आहे. सदर मार्गामध्य खारघर रेल्वे स्थानक ते तळोजा फेज-2 शिर्के कॉलनीपर्यंत कोणताही बदल करण्यात आला नसून शिर्के कॉलनीपासून पुढे मारवा सेक्टर-22, धनश्री गृहसंकुल सेक्टर 37, सिडको कॉलनी, आनंदसागर व सुखसागर गृहसंकुल, दीपसागर गृहसंकुल, स्वप्नसागर गृहसंकुल सेक्टर-34 पर्यंत सेवा वाढविण्यात आली आहे. प्रवाशांच्या मागणीनुसार आणि त्यांच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या बस मार्ग क्र. 45 मधील बदलांची नोंद घेऊन या सुविधेचा लाभघ्यावा, असे आवाहन परिवहनने केले आहे.

## गौण खनिज वाहतूक प्रकरणी 33 वाहनांवर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

अपर तहसील कार्यालयाने पनवेल परिसरात अनधिकृत गौण खनिज वाहतुकी प्रकरणी अपर तहसील कार्यालयाकडून कारवाई सुरू आहे. एप्रिल 2025 ते जून पर्यंत तहसील कार्यालयाने 33 वाहनांवर कारवाई केली. 12 वाहन चालकाकडून 27 लाख 49 हजार 490 रुपयांचा दंड जमा करण्यात आला आहे. 15 वाहन चालकांकडून दंड भरणे बाकी आहे. तर पाच वाहनांकडे वाहतूक पास असल्याने त्यांना मुक्त करण्यात आले आणि डेब्रिज असल्याने एक वाहनाला मुक्त करण्यात आले. अशा प्रकारे अनधिकृत गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई सुरू राहणार असल्याचे अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे यांनी सांगितले.

## ऑपरेशन सिंदूर मध्ये सहभागी असलेले सी.एफ.एन. जवान गणेश बलभीम खताळ यांचा गावात थाटात सत्कार

**दैनिक युवक आधार**
**राम ढाकणे**
**उरण रायगड**



बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुका मध्ये माळेवाडी गावातले भूमिपुत्र सध्या गुजरात अहमदाबाद मध्ये भारत मातेच्या सेवेसाठी कार्यरत होते, त्यांना आदेश आला आणि रातोरात राजस्थान बॉर्डर वर पोहचून सी.एफ.एन जवान श्री. गणेश बलभीम खताळ यांनी पाकड्या विरुद्ध चे ऑपरेशन सिंदूर मध्ये सहभागी होऊन, यशस्वी रित्या आपली कामगिरी पार पाडली. गणेश खताळ हे ऑपरेशन सिंदूर नंतर काही दिवसाची सुट्टी घेऊन आपल्या राहत्या गावी माळेवाडी या गावाला आले असता, गावाच्या बाजूला असलेले, सर्वांचे श्रद्धास्थान श्री मच्छिंद्रनाथ गड निमगाव व गडाचे मठाधीपती स्वामी जनार्धन महाराज, ब्रह्मनाथ संस्थान येळंब चे मठाधिपती भागवताचार्य गुरुवर्य रामेश्वर महाराज शात्री, उद्धव महाराज, सुरेश महाराज, व गावचे सरपंच अंकुश शेळके, उपसरपंच शंकर लांडगे, गावचे आदरणीय ग्रामसेवक धनवडे साहेब, शिवाजी व्हरकटे, बाळू खताळ सर, उत्तम व्हरकटे, सेवानिवृत्त फौजी सदाशिव शेळके, सत्यजित शेळके, कृष्णा शेळके, भारत कातखडे, तसेच गावातील सर्व वडील थोर मंडळी यांनी एकत्र येऊन, सी.एफ.एन जवान गणेश बलभीम खताळ यांचा हार,नारळ, ब्राम्हनाथाची प्रतिमा देऊन मोठ्या थाटात सत्कार केला. या पुढे ही अशीच देशाची सेवा घडो व ऑपरेशन सिंदूर सारख्या अजून अनेक ऑपरेशन मध्ये त्यांना यश प्राप्त होवो या साठी श्री. क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड निमगाव चे मठाधीपती स्वामी जनार्धन महाराज व ब्रम्हनाथ संस्थान येळंब चे मठाधीपती गुरुवर्य रामेश्वर महाराज शात्री यांनी शुभ आशीर्वाद दिले.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रेरणा देणारा :- पोलीस निरीक्षक शितल मालते

### शिवराज्यभिषेक दिनाचे औचित्य गुणवंताचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**

**ाळेगांव:-** छत्रपती शिवाजी महाराज आपलं दैवत आहे आपल्या मुलांना महाराजांचा इतिहास वाचायला लावणे गरजेचे आहे त्यांच्यापासून स्फूर्ती मिळेल महाराजांचा इतिहास आम्हाला प्रेरणा देणारा आहे असे प्रतिपादन नव्यानेच राळेगाव पोलीस स्टेशनला रुजू झालेल्या पोलीस निरीक्षक शितल मालते यांनी केले .छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक दिन शिवतीर्थ येथे साजरा करण्यात आला याच दिवसाच्या औचित्य साधून तालुक्यातील दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्ष नगरपंचायतीचे नगराध्यक्ष रवींद्र शेराम तर




प्रमुख उपस्थिती म्हणून पोलीस निरीक्षक शितल मालते,सौ.भावना खगन उपस्थित होत्या सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे विधिवत पूजन करण्यात आले यानंतर विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी भावना खगन यांनी इतिहास हा विषय नुसता मार्च घेण्यासाठी नसावा तो परीक्षेपुरता नसावा ती आपल्या आयुष्याची शिदोरी म्हणून शिकत राहिले पाहिजे असे विचार व्यक्त केले मार्गदर्शन नगरपंचायतीचे नगराध्यक्ष रवींद्र शेराम यांनी केले प्रास्ताविक माजी प्राचार्य अशोक पिंपरे यांनी तर कार्यक्रमाचे संचालन शंकर मोहुर्ले यांनी केले आभार प्रदर्शन राजू रोहणकर यांनी केले पोलीस निरीक्षक शितल मालते या नव्यानेच राळेगाव पोलीस स्टेशनला रुजू झाल्याच्या निमित्ताने व त्या या पोलीस स्टेशनला पहिल्याच महिला पोलीस निरीक्षक असल्याने त्यांचा आयोजन समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कुमारी देवता अनिल पुरी लोकविद्यालय कनिष्ठ महाविद्यालय खैरी वाणीज्य शाखा प्रथम प्रतिक्षा विलासराव खंडाळकर कला शाखा प्रथम लमवि व कनिष्ठ महाविद्यालय झाडगांव मेघना पृथ्वीराज गिरी विज्ञान शाखा प्रथम मार्कण्डेय पब्लीक स्कुल बरडगांव . कु आकांशा राजेश कोहाड १०वी प्रथम क्रमांक न्यु इंग्लीश हायस्कुल राळेगांव मोहित लक्ष्मण खेकारे व्दितीय न्यु. इंग्लीश हायस्कुल राळेगांव अथर्व मोहन भोरे तृतीय न्यु इंग्लीश हायस्कुल राळेगांव या गुणवंताचा सत्कार करण्यात आला कार्यक्रमाला माजी प्राचार्य अशोक पिंपरे, माजी प्राचार्य सुरेंद्र ताठे, भारत ठुणे, नितीन कोमेरवार, नगरसेवक मंगेश राऊत, अड मंगेश बोबडे, अड अल्पेश देशमुख, शंकर मोहुर्ले, राहूल बहाळे, संजय दुरबुडे, योगेश इंगोले, महेंद्र फुलमाळी, सैय्यद लियाकत अली, प्रविण काकडे, नितीन कोरडे, नगरसेवक मधुकर राजूरकर, शुभम चिडाम, लोकेश गायकवाड, चेतन बेंबारे, सचिन कोठुरकर, भूपेंद्र चांदेकर, देवराव नाखले, मंगेश पिंपरे, भटकर सर, रुपेश कोठारे, महादेव ससाणे, सार्थक बहाळे ,दिक्षा नगराळे, सौ वैशाली रोहणकर, सौ भावना बहाळे यांची उपस्थिती होती कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज उत्सव समितीच्या सर्वच सदस्यानी परीश्रम केले .

## रत्नागिरी जिल्ह्यातील निवळी येथे बस गॅस टॅंकर याच्यात झालेल्या अपघातात अनेक शिक्षक जखमी

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरी प्रतिनिधी**
**योगेश सुतार**



दि. 8 मे आज सकाळी चिपळूण मधुन रत्नागिरी येथे वरीष्ठ व निवड श्रेणीसाठी जाणाऱ्या शिक्षकाच्या बसला अपघात होऊन अनेक शिक्षक जखमी झाल्याची घटना घडली. सदर बस मधील शिक्षक हे प्रक्षिक्षणासाठी रत्नागिरी येथे जात होते. सदर प्रक्षिक्षणासाठी गैरहजर राहिलात किंवा हजेरी ऑनलाईन अपलोड झाल्यास संपुर्ण प्रक्षिक्षणातुन बांद करण्यात येण्याच्या शिक्षण संचालकांच्या फतव्याच्या भीतीमुळे आज अनेक शिक्षक हे रत्नागिरी येथे प्रशिक्षणासाठी चिपळूण वरुन रत्नागिरी ला चाले होते. प्रशिक्षणासाठी ७५ हजेरी ग्राह्य धरण्यात यासाठी क्रांती शिक्षक संघटना पहिल्या पासून च आग्रही आहे. मात्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आपला १०० उपस्थितीचा हेका सोडायला तयार नाही. प्रशिक्षणार्थी शिक्षकांचे बळी घेतल्या नंतर प्रशासन सवलत देणार आहे का. असा संतप्त सवाल शिक्षण क्रांती संघटनेचे अध्यक्ष सुधीर घास यांनी उपस्थित केला आहे.

आजारपण वाहतूक कोंडी नातेवाईकाचे आजारपण अपघात ह्या गोष्टी सांगुन येत नाहीत. यामुळे हे प्रशिक्षणासाठी उपस्थिती ही १०० ऐवजी ७५ असावी यासाठी क्रांती शिक्षक संघटना आग्रही होती

सदर अपघातामध्ये 23 शिक्षक जखमी झाले तर दोन शिक्षक गंभीर जखमी झाले आहेत. एवढेच नाही तर सदर गॅस टॅंकर वेगात असल्याने तो रस्त्यालगत असणाऱ्या घराशेजारी कोसळून गॅस लिकेज झाल्याने दोन घराच ही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक गुर ही जखमी झाली आहेत. सदर घटनास्थळी नागरिक अग्निशमन बंब महामार्ग पोलीस स्थानिक नागरिक यांनी जखमी ना तातडीने रत्नागिरी जिल्हा ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल केले. तर अग्निशमन बंबामुळे लिकेज झालेला गॅस व आग विझविण्यास यश आले. अपघात स्थळी रत्नागिरी जिल्हा पोलीस अधीक्षक बघाटे सर यांनी घटनास्थळी पाहणी केली

## शिवसेना वैद्यकीय तालुका प्रमुखपदी मा सुनिल निंबाळकर यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**सणसरः- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील जाचकवस्ती गावचे सुनिल शिवाजीराव निंबाळकर यांची इंदापुर तालुकाप्रमुख, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष पदी निवड करण्यात आली आहे.राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री मा.ना. श्री.एकनाथजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि लोकप्रिय खासदार मा.ना. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली हिंदुहृदसमाट वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या तथा डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशनच्या इंदापुर तालुकाप्रमुख पदी निवड करण्यात आली आहे.हे निवडपत्र पुणे जिल्हाअध्यक्ष सुरेंद्र जेवरे,महिला जिल्हाअध्यक्षा विद्याताई राजे गायकवाड यांच्या उपस्थितीत बारामती येथे देण्यात आले. यावेळी सणसर सोसायटीचे चेअरमन सुशील निंबाळकर,माजी ग्रामपंचायत सदस्य शरद कांबळे,किरण गायकवाड,विक्रमसिंह निंबाळकर,राहुल जगताप,विक्रम भैय्या निंबाळकर,भूषण बोराटे,शामराव गायकवाड, किरण पाठक, रणजित भोसले उपस्थित होते.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून गोर-




गरीब,गरजू आणि आर्थिक दुर्बल घटकांतील रुग्णांना धर्मादाय रुग्णालयांत (१०%) राखीव खाटा उपलब्ध करुन देणे,निकषात बसत असलेल्या गरीब रुग्णांवर पुर्णतःमोफत किंवा सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया करण्या संदर्भातील मदत तसेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत नोंदणी असलेल्या रुग्णालयांमध्ये गरजू रुग्णांना मोफत शस्त्रक्रिया करणे संदर्भात योग्य मार्गदर्शन करून गंभीर व महागड्या शस्त्रक्रिया करावयाच्या असलेल्या गोरगरीब गरजू रुग्णांना भरीव प्रमाणात अर्थ सहाय्य व्हावे या करीता पंतप्रधान वैद्यकीय सहाय्यता निधी,मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी,श्री.सिध्दि विनायक गणपती मंदीर ट्रस्ट, सर रतन टाटा ट्रस्ट यांसारख्या विविध ट्रस्टच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे नूतन तालुकाप्रमुख सुनील निंबाळकर यांनी सांगितले.

# प्रवासा दरम्यान चोरी करणाऱ्या महिला निफाड पोलिसांच्या जाळ्यात

## येवला ते नाशिक बसने संशयित महीलांचा चोरी च्या इराद्याने सुरू होता प्रवास , प्रवास करत असतांना निफाड बस स्थानकात केली अटक,

दैनिक युवक आधार
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**
**विनोद गायकवाड**
**प्रतिनिधी निफाड**

येवला ते नाशिक या बसमधून पाच ते सहा संशयित महिला (वय अंदाजे ३५ ते ४०)या आपल्या लहान बाळांना सोबत घेऊन चोरीच्या उद्देशाने निफाड कडे येत असल्याची गुप्त खबर्यामार्फत निफाड पोलिसांना माहिती मिळताच पीआय गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली निफाड पोलिसांनी, निफाड बस स्थानकात सापळा लावण्यात आला होता , सदर गाडी सकाळी ११वा, च्या



दरम्यान निफाड बस स्थानकात आली असता गाडीमधील संशयित महिलांची कसून चौकशी केली,. महिलांनी उडवा उडवीची उत्तरे दिल्याने या महिला निफाड पोलिसांच्या जाळ्यात सापडल्या


> कोणत्याही प्रवासाच्या दरम्यान प्रत्येक नागरिकांनी व महिलांनी सावध राहूनच प्रवास करायला हवा आपले मौल्यवान दागिने प्रवासात घालने टाळावे, तसेच आपल्या मागे व पुढे शेजारी कोण बसलेले आहे याचा अंदाज घ्यावा, गर्दीच्या ठिकाणी नागरिकांनी व महिलांनी आपले मोबाईल, पैशाचे पॉकेट यांची काळजी घेतली पाहिजे. जर कुणाला एखाद्या व्यक्तीच्या संशयास्पद हालचाली वाटल्यास 112 या नंबरवर फोन करून माहिती दिली पाहिजे किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क केला पाहिजे
>
> **गणेश गुरव पी आय**
> **निफाड पोलीस ठाणे**

, सदर संशयित महिलांनी दि. २४/५/२०२५ रोजी नाशिक ते संभाजीनगर चे बसने प्रवास करत असतांना औरंगाबाद नाका ते चांदोरी चौफुली दरम्यान २ ते ३ च्या दरम्यान येवला येथील एका फिर्यादी महिलेच्या कपड्याचे बॅगमधून एक सोन्याचे गंठण, पोत ,अंदाजे ६०००० रुपये किमतीचे सोने चोरी केले ,असून सायखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९८/२५ कलम ३०३ (२) BNS प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता, तसेच सदर संशयित महिलांनी मालेगाव ते अहिल्यानगर प्रवासादरम्यान दिनांक १९/४/२०२५ रोजी सावरगाव शिवार ता. येवला दरम्यान १५००००रू कीमतीचे ३ तोळे वजनाची सोन्याची पोत व१०,००० रुपये किमतीचे दहा भार वाजनाचे चांदीचे ब्रेसलेट ची चोरी केली होती, सदर घटनेची नोंद येवला शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १५९/२५ कलम ३०३(२)BNSनोद करण्यात आली होती ,सायखेडा व येवला येथील या फिर्यादी महिलांना निफाड पोलीस ठाण्यात बोलविण्यात आले होते फिर्यादी महिलांनी या संशयित महिलांना ओळखले असून याच महिलांनी आमची सोने चोरी केल्याची कबुली दिली , त्यांचा पुरवणी जबाब नोंदवून पुढील कारवाईसाठी सायखेडा व येवला पोलीस ठाण्यातील तपासी अंमलदार यांच्या ताब्यात देण्यात आले आहे, या कारवाईत पोलीस कपालेश्वर ढिकले, नितीन साळवे, धनंजय जाधव,नितीन सांगळे ,संगीता जाधव ,पुनम शिंदे, राजेंद्र दरोडे, यांनी भाग घेऊन सदर महिलांना पकडण्यात यश मिळविले

# कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयात ऑनलाईलन पद्धतीने प्रशिक्षण कार्यशाळा

दैनिक युवक आधार
निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी

जागतिक पातळीवर सर्वच क्षेत्रात महत्वपूर्ण बदल होत असताना, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे शैक्षणिक क्षेत्रात मोठया प्रमाणावर परीवर्तन होत आहे. परीवर्तन ही काळाची गरज असून, या शैक्षणिक धोरणामुळे अंतरविद्याशाखीय पद्धती, क्रेडीट पद्धत, व्यावसायीक अध्यापन, इत्यादी अध्यापन बदलांमुळे विद्यार्थांना दैनंदिन अध्यापनाबरोबरच रोजगारभिमुख शिक्षणाची संधी मिळणार आहे. बदलते शैक्षणिक धोरण स्वीकारीत असताना, शैक्षणिक संस्था आणि अध्यापकांनी नवीन धोरणामधील माहिती, नवे तंत्रज्ञान आणि विविध प्रकारचे कोर्स सक्षमपणे पूर्ण करावेत. अध्यापकांच्या शैक्षणिक गुणवत्तेमुळे विद्यार्थांच्या अडचणी कमी होईल. त्यासाठी अध्यापकांना शैक्षणिक धोरणाविषयीची माहिती मिळणे आवश्यक आहे. महाविद्यालयाने एफ.डी.पी.च्या माध्यमातून सुरू केलेले प्रशिक्षण हे महत्वपूर्ण आणि कौतुकास्पद असून याचा उपयोग हा महाविद्यालय आणि प्रशिक्षणार्थी अध्यापकांना नक्कीच होईल." असा विश्वास मविप्र समाजाचे,




आध्यापक विकास कार्यक्रम [ एफ.डी.पी.] प्रशिक्षण कार्यशाळा ऑनलाईन उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी सरचिटणीस नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, प्रो. दिनेशकुमार निमा, संचालक डॉ. आर. टी. बेद्रे, प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे आणि सहभागी सर्व प्रशिक्षणार्थी

सरचिटणीस ॲड नितिन ठाकरे यांनी व्यक्त केला कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात ऑनलाईलन पद्धतीने ' राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अभिमुखता आणि संवेदनशीलता ' या विषयाच्या अनुषंगाने व यूजीसी, पंडित मदन मोहन मालवीय शिक्षक प्रशिक्षण केंद्र, डॉ. हरिसिंग गौर विद्यापीठ ( केंद्रीय विद्यापीठ ) सागर , मध्यप्रदेश यांच्या संयुक्त विद्यमाने ०६ ते १८ जून या कालावधीत आयोजित केलेल्या आध्यापक विकास कार्यक्रम [ एफ.डी.पी.] प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी कुलगुरू नामनिर्देशित विशेष अतिथी प्रो. दिनेशकुमार निमा, संचालक डॉ. आर. टी. बेद्रे, मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर, प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, डॉ .सुसान लॉरेन्सिया, उपस्थित होते. याप्रसंगी शुभेच्छा देताना, सभापती बाळासाहेब क्षिरसागर म्हणाले," राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाने आयोजित केलेली कार्यशाळा अध्यापकांबरोबर विद्यार्थी हितासाठी उपयुक्त ठरत आहे. काळ सातत्याने बदलत आहे. बदलत्या काळानुसार होणारे बदल स्वीकारून अध्यापनात परीवर्तन करणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणामुळे महाविद्यालयाचे अध्यापकीय कामकाज शैक्षणिक धोरणानुसार उत्तम होईल." असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकेत डॉ .सुसान लॉरेन्सिया म्हणाल्या, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या विषयी अध्यापकांना माहिती मिळावी, महाविद्यालयात विविध रोजागरभिमुख कोर्सची निर्मिती व्हावी, आंतरविद्याशाखा विषयांची माहिती, परीक्षा पद्धतीमध्ये होणारे बदल या सर्वांची माहिती मिळवी या उदात्त हेतूने सुरू केलेले प्रशिक्षण निश्चित सर्वांसाठी उपयुक्त ठरेल. असे सांगितले. प्रशिक्षण शिबिरातील मान्यवरांचे स्वागत करताना, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे म्हणाले," राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे शैक्षणिक क्षेत्रात बदल होत असताना, महाविद्यालयीन अध्यापकांना या धोरणाची माहिती मिळावी या दृष्टीने आयोजित केलेल्या कार्यशाळेस उत्तम प्रतिसाद मिळाला, ही अभिमानाची बाब आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे अध्यापकांना नवीन कौशल्य आत्मसाथ करण्याची संधी निर्माण होते. संशोधन क्षेत्र, माहितीचे स्त्रोत्र आणि विविध व्यावसायिक कोर्सची माहिती मिळू शकते. त्यामुळे अध्यापक शैक्षणिक दृष्ट्या गतिमान होतील असा विश्वास व्यक्त करत त्यांनी सर्वांचे आभार मानले. कुलगुरू नामनिर्देशित विशेष अतिथी प्रो. श्री दिनेशकुमार निमा म्हणाले," जागतिक पातळीवर सर्वच क्षेत्रात रोज नवीन तंत्रज्ञान, माहिती निर्माण होत आहे. विविध देश विकासासाठी शैक्षणिक क्षेत्रात बदल करीत आहे. हे शैक्षणिक धोरण यशस्वीपणे राबविण्यासाठी विविध पातळीवर प्रयत्न केले जात असताना, निफाड महाविद्यालयाने केलेले प्रयत्न निश्चितपणे कौतुकास्पद आहे. मविप्र समाज आणि महाविद्यालयाने प्रशिक्षण सदर्भात दाखविलेला सकारात्मक विचार निश्चित कौतुकास्पद आहे. या कार्यशाळा नियोजनासाठी मविप्र समाज शिक्षणाधिकारी डॉ.नितिन जाधव यांनी विशेष सहकार्य करीत या कार्यशाळेसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यशाळेत एकूण १११ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.श्रीमती सुनिता बोरडे व आभार डॉ. आर. टी. बेद्रे यांनी मानले.

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीची स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकी संदर्भात महत्त्वाची बैठक संपन्न

दैनिक युवक आधार
नांदेड प्रतिनिधी
चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर

नांदेड - जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार पक्षाच्या वतीने राज्याचे ज्येष्ठ नेते माजी राज्यमंत्री डॉ माधवरावजी किन्हाळकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकी संदर्भात विचार विनिमय करून कार्यक्रम निश्चित करण्यासाठी दि,7 जून 2025 रोजी जिल्हा कार्यालयात जिल्हा अध्यक्ष श्री भगवानराव पाटील आलेगावकर यांचे अध्यक्ष खाली बैठक संपन्न झाली,




या बैठकीमध्ये नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुका निहाय पक्षाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या बैठकांच्या तारखा निश्चित करण्यात आल्या त्याचप्रमाणे जिल्हा परिषद सर्कल निहाय जिल्ह्याभर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राज्याचे माजी शिक्षण मंत्री नांदेड जिल्ह्याची ज्येष्ठ नेते आदरणीय कमलकिशोरजी कदम साहेब, देशाच्या राज्यमंत्री श्रीमती सूर्यकांता पाटील ,राज्याचे माजी मंत्री डॉ, माधवरावजी किन्हाळकर, जिल्हाध्यक्ष श्री भगवानराव पाटील आलेगावकर याचबरोबर जिल्ह्यातील काही प्रमुख पदाधिकाऱ्यासमवेत बैठकीत विचार विनिमय करून प्रत्येक तालुका स्तरावर बैठका व जिल्ह्यातील प्रत्येक जिल्हा परिषद सर्कल निहाय बैठका घेण्याच्या संदर्भात कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे जिल्ह्यातील सर्व तालुका अध्यक्षांची ,विधानसभा अध्यक्षांची ,शहराध्यक्षांची, सविस्तरपणे लवकरच बैठक घेऊन जिल्हाभर बैठकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात येणार आहे या बैठकीला जिल्ह्याचे उपाध्यक्ष सुभाषराव गायकवाड, जिल्हा सरचिटणीस प्रा डी बी जांभरुणकर, जिल्हा महिला अध्यक्ष प्रांजली रावणगावकर, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष शिवकुमार देवकते ,अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष प्रा मजरुद्दीन, ज्येष्ठ नागरिक सेलचे जिल्हाध्यक्ष विश्वंभर भोसीकर ,जिल्हा उपाध्यक्ष व नायगाव तालुक्याचे अध्यक्ष पांडुरंग शिंदे, कंधार लोहा विधानसभा अध्यक्ष शिवप्रसाद धोंडगे ,जिल्हा उपाध्यक्ष जीवनराव वडजे, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष रावणगावकर, हादगाव तालुक्याचे अध्यक्ष वसंतराव देशमुख, जिल्हा सरचिटणीस बालाजीराव इंगळे, भोकर विधानसभा अध्यक्ष सुभाषराव कोळगाकर ,लोहा शहराध्यक्ष रमेश चव्हाण ,जिल्हा सरचिटणीस बालासाहेब मादसवाड इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते

## चौभा निमगाव, नांदा व रुई ना.परिसरात तीन ते चार दिवसा पासून बिबट्याचा वावर

दैनिक युवक आधार
बीड आष्टी प्रतिनिधी
:- मारुती सत्रे



चौभा निमगाव,नांदा रुई परिसरात बिबट्याचा वावर दिसून आला असून. शेतकरी शेत कामाला लागला असून बिबट्यामुळे भीतीचे वातावरण झाले आहे. शेतकरी उमेश साधूराम बन्सोडे यांच्या राहत्या घरी पाळीव कुत्र्यावर रात्री बिबट्याने हल्ला केला व कुत्रा गंभीर जखमी आहे.ही बातमी वन विभागाला कळविली असून. वन विभागाने या परिसरामधील सर्व शेतकरी बांधवांना आव्हान केले आहे की संध्याकाळी सहाच्या नंतर आपले शेत कामे बंद करावे व शेतामध्ये काम करत असताना आपल्या लहान मुलांना सोबत घेऊन जाऊ नये,आणि वाकून काम करताना मोठ्याने बोलणे,मोबाईल मधील गाणे लावणे,अशा प्रकारे सावधगिरी बाळगण्याचे ओके आवाहन, चौभा निमगाव व नांदा रुई ना.परिसरातील लोकांना वन विभागाकडून आव्हान करण्यात आल आहे.

# एस एस सी बॅच १९८८-१९८९ तर्फे अच्युत गोडबोले यांचे व्याख्यन उरण पिरकोन येथे संपन्न

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी रणिता ठाकूर
उरण रायगड

आजचे युग हे तंत्रज्ञान युग आहे आजच्या काळात व्यक्ती साक्षर असून निरक्षर गणला जातो कारण संगणकीय क्षेत्रातले ज्ञान हे अत्यावश्यक ज्ञान होय विज्ञानाने केलेली प्रगती ही परंतु त्याला तांत्रिकतेची जोड कशी असावी, आजच्या युवकाने कशा पद्धतीने विचार करावा त्यासाठी रविवार दिनांक १/६/२०२५ जगप्रसिध्द अष्टपैलू व्यक्तीमत्व,संगणक तज्ञ ,लेखक आणि प्रसिध्द वक्ते अच्युत गोडबोले यांचे व्याख्यान SSC बॅच १९८८-१९८९ पिरकोन हायस्कूल यांच्या ग्रुप मार्फत झाले.




व्याख्यान अतिशय सुंदर झाले.लोकांच्या प्रतिक्रिया जाणल्यावर कौतुक केले अच्युत गोडबोले ही एक अतिशय ध्येयवेडी व्यक्ति आहे. असे ते स्वतः सांगत असतात आणि त्यांनी पुस्तकात लिहिलेले आहे. त्यांना पहिली भिती वाटत होती की,ग्रामीण भागात लोक जमतील की नाही.पण २३० ते २४० लोक पाहून आनंद वाटला कारण हॉल भरलेला होता. अच्युत गोडबोले साहेबांचा हा त्यांचा ग्रामीण भागातील पहिलाच कार्यक्रम होता. साहेबांचे आतापर्यंतचे कार्यक्रम एखादी मोठी संस्था किंवा आमदार,खासदार करत होते.एखाद्या ग्रुपने माझा कार्यक्रम केला हे त्यांना आच्छर्य वाटले. हा योग घनशाम म्हात्रे आवरे गावचे सुपुत्र ह्यांनी घडवून आणला.घनश्याम म्हात्रे हे एक स्वतः इलेक्ट्रॉनिक अभियंता आहेत. कार्यक्रम अतिशय सुंदर झाला,अनेक मान्यवर उपस्थित होते.आपल्या पिरकोन हायस्कूलमध्ये आतापर्यंत एवढ्या चतुरस्त्र, विद्वान आणि माहिती तंत्रज्ञानातील तज्ञ व्यक्तीला व्याख्यानासाठी निमंत्रित केल्याचे कुणाच्याही माहितीत नाही. हे युग माहिती तंत्रज्ञान आणि नव्याने उदयास आलेल्या कृत्रीम बुद्धीमत्तेचे (ARTIFICIAL INTELLIGENCE) आहे. या क्षेत्राची आपल्या विद्यार्थ्यांना माहिती मिळावी म्हणून अच्यूत गोडबोले यांच्यासारख्या तज्ञाची आपण निवड केलीत, त्याबद्दलही आपण अभिनंदनास पात्र आहात असे ज्येष्ठ श्रोत्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे नियोजनही चांगले होते. नरेश घरत यांनी चांगले निवेदन केले. ज्येष्ठ माजी विद्यार्थी म्हणून तुम्ही आम्हाला सन्मानित केलेत, त्याबद्दल आपणांस धन्यवाद. हे व्याख्यान विद्यार्थ्यांना भविष्यकाळात निश्चितच उपयोगी ठरेल. अशाचप्रकारे विद्यार्थ्यांना उपयोगी पडतील. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एसएससी बॅच १९८८-८९ खुप अशी मेहनत घेतली आणि कार्यक्रम हा यशस्वी केला.

## विज वितरण चा भोंगळ कारभार ! दिग्रस शहरात विजेचा दिवस रात्र लपंडाव

दैनिक युवक आधार
दिग्रस प्रतिनिधी
उमेश साखरकर

**दिग्रस :** दिग्रस हे तालुक्याचे ठिकाण असून सुद्धा येथे अनेक समस्या कायम आहेत. टाउनमध्ये सर्वाधिक विजेचा त्रास सुरू असून कनिष्ठ अभियंता यांच्या हलगर्जपणामुळे शहरात बरेच दिवसा पासून विजेचा लंपनडावं आहे. दिवस असो का रात्र असो विजेचा पुरवठा अचानक बंद होतो. व अगदी काही क्षणा साठी वीज येते आणि परत वापस जाते कधी कधी तर रात्र भर अंधारात राहवे लागते. त्यामुळे स्थानिक नागरिक वैतागले आहे. अधिकाऱ्यांना कोणत्याही लोक प्रतिनिधीची धास्ती राहिली नाही असे दिसून येत आहे. असक्षम कर्मचारी व आधिकारी यांच्येवर निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी समोर येवू लागली आहे. मान्सून हजेरी लावन्या आधी अवकाळी पाऊसा आल्यावर साधी विज सुद्धा चमकेली तर विज पुरवठा खंडीत केल्या जातो. अवकाळी पाऊस आगमन होताच पहिल्या पावसाने शहरातील विज वितरण कंपनीचा कारभार चव्हाट्यावर आला. सलग विजेचा लपंडाव सुरू असल्याने विविध शासकीय कामे खोळंबली. याबाबत स्थानिकांनी टाऊन अभियांत्यसी संपर्क करण्या करिता मागील अनेक दिवसापासून कर्मचारी यांचे मोबाईल स्विच ऑफ करून नागरिकांना वेठीस धरत असल्याच्या अनेक तक्रारी समोर आल्या आहेत. त्यामुळे वरिष्ठांचे या अधिकारी अभियंत्यावर दुर्लक्ष असल्याचे स्थानिकांनी मत व्यक्त केला आहे. मुख्य अभियंता यांनी यावर लक्ष केंद्रित करून दिग्रस शहरातील विजेचा चा त्रास कमी करण्याची मागणी केल्या जात आहे.

## वीर वाजेकर महाविद्यालयातर्फे पर्यावरण दिनानिमित्त विविध ठिकाणी वृक्षारोपण संपन्न

दैनिक युवक आधार
कॉलेजकट्टा/आरती सुरवसे

येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, महालण विभाग, फुंडे यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि राष्ट्रीय छात्र सेनेच्या (NCC) वतीने उरण तालुक्यात विविध ठिकाणी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण करण्यात आले. "प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करा" (BEAT PLASTIC POLLUTION) या 2025 च्या जागतिक पर्यावरण दिनाच्या घोषवाक्याला अनुसरून, पर्यावरण रक्षण आणि प्लास्टिकविरहित जीवनशैलीसाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत दिघोडे येथील महात्मा गांधी विद्यालय, बापूजी देव मंदिर परिसर, खारपाटील महाविद्यालय चिरनेर आणि



रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील हायस्कूल पिरकोन या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपणासोबतच चिरनेर येथील बापूजी देव देवराई परिसरात स्वच्छता मोहिमाही राबविण्यात आली. या कार्यक्रमास वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, उपप्राचार्य गजानन चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. राम गोसावी, राष्ट्रीय छात्र सेनेचे विभाग प्रमुख डॉ. राजकुमार कांबळे, यांच्यासह राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि स्वयंसेविका उपस्थित होते. महात्मा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री फल्ले सर, चिरनेर येथील खारपाटील हायस्कूलचे प्राचार्य पट्टेबहादूर सर, पिरकोन येथील शाळा व्यवस्थापन समितीचे प्रमुख श्री जीवन गावंड, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी निकेतन रमेश ठाकूर तसेच फ्रेंड्स ऑफ नेचर (FON) चिरनेर संस्थेचे श्री दिनेश चिरनेरकर हेही विविध ठिकाणी संपन्न झालेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी झाले होते. महाविद्यालयाच्या वतीने चिंच, कडुलिंब, आवळा, पिंपळ आणि करंज अशी विविध प्रकारची सुमारे 100 झाडे व काळी मिरी, वेलदोडे, दालचिनी, तेज पत्ता, कळी हळद, अडुळसा इत्यादी औषधी झाडे पण लावण्यात आली.

## अपर तहसील कार्यालयाची 33 वाहनांवर कारवाई

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

: पनवेल अपर तहसील कार्यालयाने एप्रिल 2025 ते जूनपर्यंत 33 वाहनांवर कारवाई केली. त्यांच्याकडून आकारण्यात आलेली दंडाची रक्कम शासन जमा करण्यात आली आहे. पनवेल परिसरात अनधिकृत गौण खनिज वाहतुकी प्रकरणी अपर तहसील कार्यालयाकडून कारवाई सुरू आहे. एप्रिल 2025 ते जून पर्यंत तहसील कार्यालयाने 33 वाहनांवर कारवाई केली. 12 वाहन चालकाकडून 27 लाख 49 हजार 490 रुपयांचा दंड जमा करण्यात आला आहे. 15 वाहन चालकांकडून दंड भरणे बाकी आहे. तर पाच वाहनांकडे वाहतूक पास असल्याने त्यांना मुक्त करण्यात आले आणि डेब्रिज असल्याने एक वाहनाला मुक्त करण्यात आले. अशा प्रकारे अनधिकृत गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई सुरू राहणार असल्याचे अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे यांनी सांगितले



## अरण तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी १२७ कोटींचा महत्त्वाकांक्षी आराखडा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लवकरच भूमिपूजन

दैनिक युवक आधार
छत्रपती संभाजीनगर,

**ता. प्रतिनिधी** – संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी मंदिरे असलेल्या अरन तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी १२७ कोटी रुपयांचा भव्य आराखडा सादर करण्यात आला आहे. लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या विकास कामांचे भूमिपूजन होणार असून, यामुळे परिसरातील धार्मिक पर्यटनाला मोठा चालना मिळणार आहे.या आराखड्यात मंदिर परिसर विकास, सभामंडप, भक्त निवास, उद्यान, स्वच्छतागृह, पार्किंग, पादचारी मार्ग आदी विविध सुविधांचा समावेश करण्यात आला आहे. या कामांमुळे भाविक व पर्यटकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा निर्माण होणार आहेत. प्रकल्पासाठी १२७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, हा प्रकल्प संत सावता महाराजांच्या नावलौकिकाला साजेसा असेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी माळा तालुक्यातील आमदार, पंचायत समितीचे सभापती, जि.प. सदस्य, गटविकास अधिकारी, तहसीलदार आदी मान्यवरांची उपस्थिती होती. अरन तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास होऊन, भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक त्या सुविधा लवकरात लवकर पूर्ण व्हाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.



## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उगाव येथे. वृक्षारोपण व रोपे वाटप

### डॉ. रोहित धोक्रट यांचे मार्गदर्शन

दैनिक युवक आधार
निफाड प्रतिनिधी
राहुल कुलकर्णी



निफाड तालुक्यातील द्राक्ष नगरी म्हणून ओळखले जाणाऱ्या उगाव येथे जागतिक पर्यावरण दिना चे औचित्य साधून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या व सेवा भारती पश्चिम महाराष्ट्र प्रांत, नाशिक तसेच उगाव येथील तरुण कार्यकर्ते, स्वयंसेवक व सामाजिक कार्यकर्ते नितीन पानगव्हाणे, यांच्या पुढाकाराने उगाव शहरात प्रत्येक कुटुंबासाठी दोन झाडे याप्रमाणे एकूण ८०० झाडांच्या रोपांचे वाटप करून लागवड करण्यात आली.

जे कुटुंब लावलेल्या झाडांचे तीन वर्षांसाठी संवर्धन व संरक्षण करण्याचे हमी देतील अशाच कुटुंबांना रोपांचे वितरण करण्यात आले. उगाव येथील श्रीराम मंदिरात सदर कार्यक्रम संपन्न झाला. त्याप्रसंगी उंगाव-खेडे येथील संत विष्णू महाराज जेऊघाले यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पुजन व वृक्ष रोपांचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून निफाड येथील साई मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल चे संचालक डॉ. रोहित धोक्रट होते. त्यांनी पर्यावरण संवर्धन, तसेच पर्यावरणाचे महत्त्व, मानवी आरोग्यासाठी कोरोणा काळातील उपयोगी पडलेल्या वृक्षांचे महत्व .. कोरोना काळातील रुग्णांच्या आरोग्यासाठी वृक्षांचे योगदान....याविषयी वैज्ञानिक माहिती उपस्थितांना देवून प्रत्येकाने एक तरी झाड लावून त्याचे संवर्धन केले पाहिजे. झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश उपस्थितांना दिला. .राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ग्रामविकास विभागाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत प्रमुख श्री योगेश भारद्वाज यांनी वातावरणात निसर्गातील मानवाची ढवळाढवळ निसर्गातील सर्व जीवसृष्टीला वाचविण्यासाठीचे निसर्गाचे योगदान शेतीतील वृक्षांचे महत्त्व याविषयी उपस्थितांना माहिती दिली .याप्रसंगी गावातील ज्येष्ठ नागरिक, बाल स्वयंसेवक ,तरुण स्वयंसेवक व सहपत्नीक उगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते . सदर वृक्षांची लागवड ही उगाव शहर आणि परिसरातील शेतावरील बांध, रस्त्याच्या कडेला, नदीकाठच्या परिसरात लागवड करण्यात आली. याप्रसंगी वनविभागाचे अधिकारी ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते.

## अक्रम चव्हाण यांच्या कुटुंबीयांकडून 'जिव्हाळ्याची भिंत' उपक्रमांतर्गत गरजूंना ईदनिमित्त अन्नदान

दैनिक युवक आधार
घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)

**घाटंजी:** बकरी ईदच्या पावन पर्वाचे औचित्य साधत घाटंजी येथील 'जिव्हाळ्याची भिंत' अन्नदान छत्राच्या माध्यमातून निराधार आणि गरजू व्यक्तींना काल, ८ जून रोजी अक्रम चव्हाण यांच्या कुटुंबीयांकडून मायेचा घास देण्यात आला. या अन्नदान वाटप प्रसंगी 'जिव्हाळ्याची भिंत' उपक्रमाचे संयोजक व सचिव सुरज हेमके व स्वयंमसेवक दर्शन मेश्राम आणि बादल धोत्रे उपस्थित होतो. घाटंजी शहरात गेल्या नऊ वर्षांपासून 'जिव्हाळ्याची भिंत' हे अन्नदान छत्र अविरतपणे कार्यरत आहे. ज्या वयोवृद्ध आणि निराधार घटकांना कोणीही नाही, अशा गरजू व्यक्तींना हे उपक्रम दररोज न चुकता अन्नदान करतो.

अन्नदानासोबतच त्यांना आवश्यक वस्तूंचा पुरवठा देखील 'जिव्हाळ्याची भिंत' द्वारे केला जातो.



अक्रम चव्हाण यांच्या कुटुंबीयांनी ईदच्या शुभमुहूर्तावर या सामाजिक कार्याला हातभार लावत गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला. त्यांच्या या सहकार्याबद्दल 'जिव्हाळ्याची भिंत' अन्नदान छत्राने कृतज्ञता व्यक्त केली आहे.

## भेवंडी बसस्थानक आगारात स्विमिंग पूल येथील हि अवस्था आहे

दैनिक युवक आधार
उल्हासनगर/रशीद शेख

परिवहन मंत्र्याच्या ठाणे जिल्ह्यातील बसस्थानक एकमेव मानलेले भेवंडी बसस्थानक आहे आणि तेथील हि दुर्लक्ष केले जाते तलाव सारखी अवस्था झाली आहे महानगर पालिकांच्या अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल नाही मुग गिळून गप्प का बसले असा प्रश्न प्रवासी यांना पडला आहे यला फक्त जबाबदार महापालिका नाही तर नगरसेवक व बसस्थानक आगारात जो सर्वच पदांवर कार्यरत आहे तो सर्वात महत्त्वाचे जबाबदार आहे खरं त्यांचे या तलावाकडे दुर्लक्ष झाले आहे दररोज येथे राज्य तसेच बाहेरील राज्यातील बसेस येत असतात तेव्हा वाहन चालकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते तसेच



प्रवाशांना पाण्यात उतरून चढउतार करावी लागते. परिवहन मंत्र्यांनी येथे भेट देऊन या तलावाची दुर्दशा बघावी अशी मागणी प्रवासी करत आहे

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## कोकणात कट्टा माणूसकीच्या भिक्षा फेरीतून साई आधारला मदत

### साईधार या संस्थेला संकलन केलेले दोन हजार किलो तांदूळ व डाळीची मदत

दैनिक युवक आधार
मुंबई (शांताराम गुडेकर)

कोकण कट्टा विलेपार्ले तर्फे यंदा ९ व्या वर्षीही माणुसकीची भिक्षाफेरीतून साईधार या संस्थेला दोन हजार किलो तांदूळ व डाळ अशी संकलन केलेली मदत करण्यात आली. श्री स्वामी समर्थ मठ विलेपार्ले यांच्या विशेष सहकार्याने हा उपक्रम यशस्वीरित्या सुरू आहे. बालग्राम पनवेल व सह्याद्री संस्था देवबांध येथे ही अन्नधान्य देण्यात येणार आहेच.साई आधार ही निराधार मुलांना घरपण देणारी संस्था आहे.विशाल परुळेकर यांच्या या आश्रमात जाऊन प्रत्यक्ष भेट घेण्यात आली.कोकणकट्टा संस्थापक अजित पितळे, मार्गदर्शक जगन्नाथ गावडे,खजिनदार सुजित कदम,विवेक वैद्य, प्रथमेश पवार, प्रभाकर खेडेकर, मनिष माईन, निशी मोरे, सचिन माने,अथर्व मुरमुरे उपस्थित होते.उदय कौलकर यांनी मुलांना पेन तर रवी तांबे यांनी मुलांना सकाळचा अल्पोपाहार व संजय कदम यांनी केक अशा भेट वस्तू दिल्या.








## जाहीर नोटीस

सर्व जनतेस विशेषतः मौजे आष्टी, ता. परतुर, जि. जालना येथील जनतेस याव्दारे कळविणेत येते की, मौजे मौजे आष्टी, ता. परतुर, जि. जालना येथील जमीनीचे वर्णन व तपशिल खालीलप्रमाणे.
शेतकऱ्याचे नाव

**गट नंबर**

**क्षेत्र**
**हे. आर**
**पो.ख**

**१) साळीकराम रंगनाथ आगलावे**
१०९
०.८२,००

**२) रोहिदास साहेबराव थोरात**
१०९
२.६५.००
२.८४.००

**३) पंढरीनाथ साहेबराव थोरात**
१०९

**४) साळीकराम रंगनाथ आगलावे**
**५) रंगनाथ साळीकराम आगलावे**
१०९

**६) नवनाथ साळीकराम आगलावे**
**७) नागनाथ साळीकराम आगलावे**
**८) नागनाथ साळीकराम आगलावे**
१०९

**वरील गटापैकी क्षेत्र हे. ७.५१.०० आर असे.**
वरीलप्रमाणे मिळकतीचे धारक यांनी त्यांचे नावे असलेले स्वतंत्र व समाईक मालकीची मिळकत आमचे अशिल राधालक्ष्मी कॉटन प्रा. लिमिटेड कंपनी करीता सोलर प्लान्ट व्यवसायाकरीता भाडेतत्वावर मिळकत देण्याचे ठरविलेले आहे.

यदाकदाचित सदर मिळकतीवर इतर कोणाचाही, कसल्याही प्रकारे हरकत असल्यास अथवा विक्री, खरेदीखत असाईनमेंट, अदलाबदल दस्त, चार्ज, बक्षीस, गहाण, करार, ट्रस्ट, परवाना असे कोणत्याही मार्गाने असलेले हक्क अधिकार, देखभाल हक्क, कुळ, भाडेकरू हक्क, पोटभाडेकरू, वारसाहक्क, भाडेपट्टा, सब-लीज, वारसाहक्क, धारणाधिकार, देखभाल, मृत्यूपत्र, ताबा हक्क, भोगवटा, विकसनाचे हक्क, एकत्रित विकसनाचे हक्क, सह विकसनाचे हक्क, प्रकल्प व्यवस्थापन हक्क, संयुक्तिक हक्क, सहयोग, कुटूंबिक व्यवस्थापन / करारनामा, इच्छापत्र, प्रशासनाचे पत्र, प्रोबेट, लीस पेंडन्स, डिक्री, न्यायालयाचा कोणताही आदेश, इतर कोणत्याही मार्गाने कोणत्याही व्यक्तीला भागीदार फर्म, एलएलपी, हिंदु अविभक्त कुटूंबाचे हक्क, कंपनी, कार्पोरेट संस्था, बँक, वित्तीय संस्था, नॉन बँकींग वित्तीय संस्था, कंपनी, आते व्यक्ती मंडळी, सावकार, कर्जदार व इतर व्यक्तीचे कोणतेही हक्क/टायटल/दावा/इस्टेट/हिस्सा/नफा/मागणी/व्याज असलेली व्यक्ती असल्यास संबंधीत व्यक्तींनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत रजिस्टर पोष्टाने खाली नमुद केलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी खात्री पटवून द्यावी, तसे न केल्यास कोणत्याही प्रकारे तथाकथित हक्क, हक्का टायटल/दावा/इस्टेट/हिस्सा/नफा/मागणी / इ. असल्यास संबंधीत व्यक्तींनी ती कायमस्वरूपी सोडून दिला असे समजण्यात येईल व सदर जमीन मालकांची मिळकत ही निर्वेध आणि निजोखमी मानली जाईल आणि सदर मिळकत बोजारहित असे समजून आमचे कायमस्वरूपी सोडून दिला असे समजण्यात येईल व सदर जमीन मालकांची मिळकत ही निर्वेध आणि निजोखमी मानली जाईल आणि सदर मिळकत बोजारहित असे समजून आमचे अशिल वरील जमीन मालकांसोबत भाडेकराराचा व्यवहार पूर्ण करतील ह्याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली असे. दि. /६/२०२५

**अशिलातर्फे**
ॲड. पूर्णानंद अ. जाधव
माण जि. सातारा
मो.९९७५१०१०९९

**अशिल**
राधालक्ष्मी कॉटन प्रा. लिमिटेड दहिवडी
ता. श्री. अनिल प्रभाकर बुधावले मु.पो.
दिघंची, ता. आटपाडी जि. सांगली